**१)मागणी क्रं.एच-८,४०५९-सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च,१०१ बांधकाम (११) (०१) तुरूंग, पंचवार्षीक योजनांतर्गत योजना या लेखाशिर्षाखाली**

**अ)** राज्यातील कारागृहातील नविन/दुरुस्तीचे बांधकामे रु.२०.०० लक्ष वरील बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार शासनास आहेत.

**ब)** शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तीका, १९७८ (सुधारीत) भाग पहीला, उपविभाग पाच मधील अनुक्रमांक ३, नियम क्र. १३४ अन्वये राज्यातील कारागृहातील नविन/दुरुस्तीचे बांधकामे करणे रु.२०.०० लक्ष पर्यंत विभाग प्रमुख (मा.अ.पो.म.सं.व का.म.नि.) यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार या कार्यालयास आहेत.

**२)** शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनिमय, भाग-२ निांक १७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय नियमावली १९७८, (सुधारीत) भाग पहीला, उपविभाग पाच,अ.क्र. ७, नियम क्रमांक २३४ अन्वये **"स्वेच्छानिधी अनुदाने-३१"** या शिर्षाखाली किरकोळ बांधकामासाठी व दुरुस्ती करणे निधीचे नियत वाटप करणे रु.३.०० लक्ष पर्यंत विभाग प्रमुख यांना स्वेच्छानिधीअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार आहेत.

राज्यातील कारागृहाकडून वरील लेखाशिर्षा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेली अंदाजपत्रके मुख्यालयास सादर करण्यात येतात.

३)१३ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार तुरूंगातील सोयी सुविधामध्ये वाढ करणे याबाबीअंतर्गत सन२०१२-१३ मध्ये प्राप्त निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमापणपत्र सादर करणे.

४)कारागृहात बंदयांच्या क्षमतेपेक्षा जास्त बंदी असल्याने त्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. याबाबत सविस्तर आढावा घेवून कारागृह निहाय सोयी सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक सुनिश्चीत कृती आराखडा (Action Plan) प्रमाणे माहिती मुख्यालयास सादर करणे.